साक्षीदार क्र ०७ ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–अनिकेत देविदास मेघरे
वय २७ वर्ष, व्यवसाय– इंजिनियरिग हेल्पर इंडिया
राह. पिपरा, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. घटना दि.२७.०८.२०१८ रोजी पिपरा गावी माझ्या घरी घडली आहे. सदर दिवशी माझ्या घरी ग्रामपंचायतची चौकशी येणार होती. त्यावेळी चौकशी कामी ग्रामपंचायतचे सचिव, सरपंच, उपसरपंच, व इतर सदस्य इत्यादी घराच्या मोजणी बाबत आले होते. त्यावेळी मोजणीचे काम चालू होते. त्यावेळी माझ्या बाबासोबत आरोपींचा वाद झाला. त्यावेळी माझ्या बाबासोबत शंकर मेंघरे, देवराव मेंघरे, लोभा मेंघरे, सचिन मेंघरे, रामा मेंघरे, चंद्रकला मेंघरे व कल्पना मेंघरे यांनी वाद केला. त्यावेळी वाद चालू असतांना शंकर मेंघरे, देवराव मेंघरे, लोभा मेंघरे, सचिन मेंघरे, रामा मेंघरे, चंद्रकला मेंघरे व कल्पना मेंघरे यांनी मला व माझे वडील देविदास यांना काड्यानी मारहाण चालू केली. तसेच लोभा मेंघरे या आरोपीने लोखंडी रॉडने माझ्या वडिलांना डोक्यावर मारले. त्यामुळे माझे वडील खाली पडले. मला दोन आरोपी नामे देवराव मेंघरे व रामा मेंघरे यांनी हातबुक्याने व काडीने मारले. माझ्या आईला आरोपी चंद्रकला व कल्पना यांनी केसं ओढून मारले. त्यानंतर मी माझ्या वडिलांना पी.एच.सी बेला येथे उपचारासाठी नेले. त्यानंतर आम्हाला मेडिकल कॉलेज नागपूर येथे रेफर केले.

२ त्यानंतर माझ्या वडीलांवर त्याठिकाणी उपचार चालू होता. पोलिसांनी माझे बयाण घेतले. माझ्या वडिलांना व मला ज्या काठीने आरोपीने मारले होते ती काठी दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला व्ही.पी नं.१९/२०२५ वरील काठी व एक लोखंडी रॉड दाखविण्यात आले, ते तेच आहे. काठीला यापूर्वीच एम.ओ.१ देण्यात आलेला आहे तर लोखंडी रॉडला एम.ओ.२ देण्यात आलेला आहे. आरोपीला मी पाहिल्यास ओळखतो त्यापैकी दोन आरोपी गैरहजर आहेत व इतर आरोपी हजर आहेत व ते तेच आहेत. पोलिसांनी आम्हाला वैदकीय तपासनी कामी पाठविले होते.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे श्री. ॲड. ए.बी.पोंगडे यांच्यातर्फे उलटतपास सुरू.</u>**

३. माझ्या वडीलांचे नाव देविदास मेंघरे आहे. देविदास मेंघरे व आरोपी शंकर मेंघरे हे सख्खे भाउ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई सण २०१२ ते २०१६ पर्यंत पिपरा गावची सरपंच होती. माझ्या वडिलांना अंबादास मेंघरे नावाचा भाउ आहे. माझ्या घराच्या पुर्वेला रोड आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे त्याच रोडने जाणे येणे करतात. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, आरोपी हे मुख्य रस्त्याने जाणे येणे करतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी पूर्वेकडील रोडवर बांधकाम करून अतिक्रमण केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी रोडवर बांधकाम केल्यामुळे गावक–यानी व आरोपींनी माझया वडिलांविरूध्द ग्रामपंचायतकडे अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर अर्जावरून ग्रामपंचातने मोक्काचौकशी लावली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझया वडिलांनी विनंती केल्यामुळे मोका चौकशी पुढे ढकलली होती.

४. हे म्हणणे खरे नाही की, गावक–यांनी व आरोपींनी दि.२४/०५/२०१८ रोजी मोका चौकशी करण्याकामी माझया वडिलांविरूध्द ग्रामपंचायतकडे दुसरा अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर अर्जावरून दि.२८/०५/२०१८ रोजी दुसरीमोका चौकशी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी मोका चौकशी झाली होती त्यावेळी पोलीस हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, जयावेळी मोकाचौकशी झाली त्यावेळी माझ्या वडिलांनी सदर रस्त्यावर अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले होते.

प्रश्न– ज्यावेळी मोका चौकशी चालू झाली त्यावूळी पाऊस सुरू होता काय ?

उत्तर– पाऊस संपल्यानंतर मोका चौकशी सुरू झाली होती.

५. हे म्हणणे खरे आहे की, रोडच्या दोन्ही बाजूने नाल्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मोका चौकशी झाली त्यावेळी गावातील लोक हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोका चौकशी दरम्यान माझ्या वडिलांनी अतिक्रमन केल्याचे निष्पन्न् झालयामूळे सदर अतिक्रमन काढण्यासाठी ग्रामपंचायतने सूचित केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे वडिल हे शंकर मेंघरे यांच्या अंगावर धावून गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे वडिल नालीत पडले त्यामुळे माझ्या वडिलांना मार लागला.

६.   हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपीनी माझ्या आईवडिलांविरूध्द बेला पो.स्टे. ला फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी ग्रामपंचायतविरूध्द सदर न्यायालयात दिवाणी दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायतने माझ्या वडिलांना अतिक्रमण हटविण्याबाबत नोटीस दिला होता त्यामूळे माझ्या वडिलांनी सदर दावा दाखल केला. माझ्या गावात दोन राजकिय गट आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही व आरोपी वेगवेगळया गटाचे आहोत. आरोपीचे व आमचे २०१२ पासून ते २०१६ पर्यंत पटत होते परंतू त्यानंतर माझ्या बहिणीच्या लग्नानंतरपासून आरोपीसोबत आमचे पटत नाही.

७.   पोलीसांनी माझे बयाण घेतले होते. पोलीसांना बयाण देते वेळेस लोभा मेंघरे यांनी माझ्या वडिलांना लोखंडी रॅाडने मारले होते ही बाब सांगितली होती. आता मला माझे बयाण दाखविण्यात आले त्यामध्ये वरिल मजकूर नमूद नाही तो का नमूद नाही याचे कारण मला सांगता येत नाही.

८   एम.ओ.१ सारख्या काठया शेतशिवारात मिळतात व एमओ.२ सारख्यया लोखुंडी सळया बांधकामावर मिळतात व त्या गावामध्ये सहज उपलब्ध होतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीनी आम्हाला म्हणजेच मला, माझ्या वडिलांना व माझ्या आईला कोणतीही मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ राजकिय व्देषातून आरोपी विरूध्द माझ्या वडिलांनी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी हआम्हाला मारहाणच केली नाही त्यामुळे आम्हाला उपचाराकामी पाठविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला खोटया केसमध्ये फसविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पूर्ण</u>

<u>फेरतपास काही नाही.</u>

वा.दा.ब.अ.सा.     समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.२१.०२.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड